आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

५ जुलै २०२४ - शुक्रवार

**ठळक बातम्या**

- देशात २०२३-२४ या वर्षांत संरक्षण सामुग्रीचं विक्रमी मूल्याचं उत्पादन
- राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते संरक्षण अधिकारी शौर्य पुरस्कारांचं वितरण
- ब्रिटनमध्ये झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत हुजूर पक्षाचा पराभव / प्रधानमंत्री ऋषी सुनक यांचा राजीनामा
- वैद्यकीय पदव्युत्तर प्रवेशासाठीच्या नीट - पी जी प्रवेश परीक्षेचं सुधारित वेळापत्रक जाहीर

**आणि**

- टी २० विश्वचषकविजेत्या भारतीय संघातल्या मुंबईकर क्रिकेटपटूंचा महाराष्ट्र विधान भवनात सत्कार / भारतीय संघाला राज्य सरकारकडून ११ कोटी रुपयांचं बक्षीस जाहीर

**<><><><><>**

देशात २०२३-२४ या वर्षांत संरक्षण सामुग्रीचं विक्रमी मूल्याचं उत्पादन झालं. २०२३-२४ या वर्षांत उत्पादन मूल्य सुमारे एक लाख २६ हजार ८८७ कोटी रुपयांपर्यंत होतं. ही वाढ गेल्यावर्षीच्या तुलनेत १६ पूर्णांक ८ शतांश टक्क्यांहून अधिक आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील मेक इन इंडिया कार्यक्रमाअंतर्गत नवनवीन विक्रम होत असल्याचं संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी समाज माध्यमावर केलेल्या पोस्टमध्ये नमूद केलं आहे. याच पोस्टमधे राजनाथ सिंह यांनी संरक्षण सामुग्रीचं उत्पादन करणाऱ्या सार्वजनिक आणि खासगी उद्योगांचंही अभिनंदन केलं.

संरक्षण मंत्रालयानं दिलेल्या माहितीनुसार २०२३-२४ या वर्षांतल्या उत्पादनांच्या एकूण मूल्यापैकी सुमारे ७९ पूर्णांक २ दशांश टक्के योगदान सार्वजनिक तर २० पूर्णांक ८ दशांश टक्के योगदान खासगी क्षेत्राचं आहे. जागतिक पातळीवर भारताला मुख्य संरक्षण केंद्र म्हणून विकसीत करण्यासाठी अनुकूल वातावरण करण्यासाठी हे सरकार वचनबद्ध असल्याचं ही राजनाथ सिंह यांनी सांगितलं.

<><><><><>

कर्तव्यावर असताना अतुलनीय कामगिरी केलेल्या संरक्षण दलांमधल्या वीरांना तसंच शहीदांच्या कुटुंबियांना शौर्य पुरस्कारांचं वितरण राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते आज झालं. दिल्लीत राष्ट्रपती भवनात आज संरक्षण अधिकारी शौर्य पुरस्कार वितरण सोहळा - 2024 आयोजित केला होता. राष्ट्रपतींनी या कार्यक्रमात १० कीर्ती चक्र आणि २६ शौर्यचक्र प्रदान केले. यामध्ये सात मरणोत्तर कीर्तिचक्र तसंच नऊ मरणोत्तर शौर्यचक्रांचा समावेश होता.

या सोहळ्याला उपराष्ट्रपती जगदीप धनखड, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, संरक्षणमंत्री राजनाथ सिंह, लोकसभेतले विरोधी पक्ष नेते राहूल गांधी आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

<><><><><>

ब्रिटनमध्ये झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीचे निकाल आज जाहीर झाले. या निवडणुकीत हुजूर पक्षाचा पराभव झाल्यानंतर प्रधानमंत्री ऋषी सुनक यांनी पदाचा राजीनामा दिला. निवडणुकीत झालेल्या पराजयाची जबाबदारी घेत सुनक यांनी हुजूर पक्षाच्या नेतेपदावरूनही पायउतार होण्याचा निर्णय घेतला आहे.

प्रधानमंत्री पदाचा राजीनामा दिल्यानंतर सुनक यांनी मनोगत व्यक्त केलं.हुजूर पक्षाला निवडणुकीत पराभव पत्करावा लागल्याबद्दल सुनक यांनी समर्थकांची माफी

मागितली.तसंच २०१० च्या तुलनेत गेल्या १४ वर्षांत ब्रिटन समृद्ध, निःपक्ष आणि अधिक सक्षम झाल्याचं सुनक यांनी मनोगतात सांगितलं. दरम्यान, या निवडणुकीत मजूर पक्षानं घवघवीत यश मिळवलं असून पक्षाचे नेते कीयर स्टार्मर ब्रिटनचे नवे प्रधानमंत्री होणार आहेत.

**<><><><>**

बिहार आणि आंध्र प्रदेश प्रमाणे महाराष्ट्रालाही विशेष दर्जा किंवा विशेष पॅकेज मिळावं यासाठी प्रयत्न करणार असल्याची घोषणा अर्थमंत्री अजित पवार यांनी विधानसभेत केली. अर्थसंकल्पावरच्या चर्चेला ते उत्तर देत होते. भविष्यात उत्पन्न वाढवण्यासाठी प्रयत्न करावेच लागतील असं ते म्हणाले. राजकोषीय तुटीविषयी अर्थसंकल्पावरच्या  चर्चेत विविध सदस्यांनी चिंता व्यक्त केली होती. त्यावर राज्यात ही तूट केंद्र सरकारने घालून दिलेल्या ३ टक्क्याच्या मर्यादेत असल्याचं त्यांनी स्पष्ट केलं. २०२८ पर्यंत राज्याची अर्थव्यवस्था १ ट्रिलियन डॉलरची करण्याचं उद्दिष्ट आहे. त्यासाठी विविध स्तरावर प्रयत्न सुरू आहे, अशी माहिती पवार यांनी दिली.

**<><><><>**

विधानपरिषदेत अर्थसंकल्पावरची चर्चा आज सुरु झाली.  राज्याच्या तिजोरीत खडखडाट असताना निवडणुका डोळ्यासमोर ठेवून केवळ स्वतःचा अजेंडा राबवण्यासाठी सरकारनं अर्थसंकल्पाचा वापर केला आहे  अशी टीका विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी केली. राज्याची आर्थिक स्थिती ,उत्पन्न आणि तूट यांचा ताळमेळ न राखता या अर्थसंकल्पात केवळ घोषणांच केल्या आहेत, मात्र प्रत्यक्षात त्याचा जनतेला लाभ होणार नाही, असं ते म्हणाले.

**<><><><>**

स्पर्धा परीक्षेत गैरव्यवहार रोखण्यासाठीचं महाराष्ट्र स्पर्धा परीक्षा अनुचित मार्ग प्रतिबंध विधेयक आज विधानसभेत मांडण्यात आलं. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षा, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेकडून घेतली जाणारी शिक्षक अभियोग्यता आणि बुद्धिमत्ता चाचणी (TAIT) आणि शिक्षक पात्रता चाचणी (TET), यासह शासनाच्या विविध विभाग आणि प्राधिकरणाकडून घेतल्या जाणाऱ्या परीक्षांच्या बाबत या कायद्यातील तरतुदी लागू असतील. यात अयोग्य मार्गांचा वापर करणाऱ्यांना ३ ते ५ वर्ष शिक्षा आणि १० लाख रुपये दंड करण्याची तरतूद आहे. सेवा पुरवणाऱ्या संस्थेचे कर्मचारी यात दोषी आढळले तर त्यांनाही ३ ते १० वर्ष तुरुंगवास आणि १ कोटी रुपये दंड आकारला जाणार आहे.

**<><><><><>**

विधान परिषदेच्या द्वैवार्षिक निवडणुकीसाठी मतदान होणार हे आज स्पष्ट झालं. अर्ज मागे घेण्याच्या आजच्या शेवटच्या दिवशी कुणीही अर्ज मागे न घेतल्यानं ११ जागांसाठी १२ उमेदवार रिंगणात आहेत. आता १२ जुलै रोजी मतदान होऊन त्याचदिवशी सायंकाळी मतमोजणी होणार आहे.भाजपकडून पंकजा मुंडे, परिणय फुके, सदाभाऊ खोत, योगेश टिळेकर आणि अमित गोरखे रिंगणात आहे. राष्ट्रवादी काँग्रेसकडून राजेश विटेकर आणि शिवाजीराव गर्जे, शिवसेनेकडून माजी खासदार कृपाल तुमाणे आणि भावना गवळी, काँग्रेसकडून प्रज्ञा सातव निवडणूक लढवत आहेत. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून मिलिंद नार्वेकर आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या पाठिंब्याने शेकापाचे जयंत पाटील विधान परिषदेची निवडणूक लढवत आहेत.

विधानसभा सदस्यांमधून यापैकी ११ सदस्य विधान परिषदेवर निवडून जाणार आहेत. विजयी होण्यासाठी उमेदवारांना पहिल्या पसंतीची २३ मत मिळवणे आवश्यक आहे.

<><><><>

वैद्यकीय पदव्युत्तर प्रवेशासाठीच्या नीट - पी जी प्रवेश परीक्षेचं सुधारित वेळापत्रक राष्ट्रीय परीक्षा महामंडळानं आज जाहीर केलं. त्यानुसार नीट - पी जी प्रवेश परीक्षा २०२४ ही आता ११ ऑगस्ट या दिवशी दोन सत्रात घेतली जाणार आहे. ही परीक्षा गेल्या महिन्यात, परीक्षेच्या आदल्या दिवशी पुढे ढकलण्यात आली होती.

<><><><>

टी २० विश्वचषक विजेत्या भारतीय संघातल्या मुंबईकर क्रिकेटपटूंचा आज विधान भवनात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते सत्कार झाला. विश्वचषक विजेत्या भारतीय संघाला राज्य सरकारनं ११ कोटी रुपयांचे बक्षीस जाहीर केल्याची घोषणा मुख्यमंत्र्यांनी या कार्यक्रमात केली. आजच्या सत्कारमूर्तींमध्ये संघाचा कर्णधार रोहित शर्मा तसंच सूर्यकुमार यादव, शिवम दुबे आणि यशस्वी जयस्वाल या खेळाडूंचा समावेश होता. गोलंदाजी प्रशिक्षक पारस म्हांब्रे आणि संघ व्यवस्थापक अरुण कानडे यांचाही सत्कार मुख्यमंत्र्यांनी केला. देशाला संपूर्ण संघाचा अभिमान असून सर्वोत्तम क्रिकेटपटू घडवण्यासाठी मुंबईत अकादमी सुरू करायला राज्य सरकार पूर्ण सहकार्य करेल, असं आश्वासन मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिलं. विविध सामन्यात विविध खेळाडूंनी चांगली कामगिरी केल्यानं हा विजय साकार झाला असल्याचं कर्णधार रोहित शर्मा यानं यावेळी सांगितलं.

<><><><>

महिला क्रिकेटमधे, भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातल्या टी-२० मालिकेतला पहिला सामना आज चेन्नईतल्या चिदंबरम स्टेडिअमवर सुरु आहे. शेवटची बातमी हाती आली तेव्हा दक्षिण आफ्रिकेच्या १५ षटकात १ बाद १३१ धावा झाल्या होत्या.

<><><><><>

काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी आज हाथरस दुर्घटनेत मरण पावलेल्यांच्या कुटुंबियांची भेट घेऊन त्यांचं सांत्वन केलं. यातले बहुसंख्य आर्थिक दृष्ट्या दुर्बल असून त्यांना जास्तीत जास्त अर्थसहाय्य मिळावं, अशी मागणी गांधी यांनी राज्यसरकारकडे केली. दरम्यान या प्रकरणाची चौकशी करणाऱ्या विशेष तपास पथकाने आपला अहवाल आज मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांना सादर केला. सुमारे १०० संबंधितांच्या जबान्या नोंदवून हा १५ पानी अहवाल तपास पथकाने तयार केला आहे.

<><><><><>

भारतीय रेल्वे यावर्षी 2 हजार ५०० जनरल कोच डब्यांचं उत्पादन करणार आहे त्याशिवाय १०हजार डब्यांचं उत्पादनही नंतर घेतलं जाणार आहे, असं केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज सांगितलं. भारतीय रेल्वेचं गतीशक्ती विश्वविद्यालय आणि एअरबस ही खाजगी विमान उत्पादक कंपनी यांच्यामधल्या सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या झाल्या त्यावेळी ते बोलत होते. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक आणि मध्यमवर्गाला सोयी देणे याकडे सरकारचा कल आहे, असं सांगत गेल्या वर्षी प्रधानमंत्र्यांनी याच उद्देशाने दोन अमृतभारत गाड्यांना हिरवा झेंडा दाखवला असं वैष्णव यांनी नमूद केलं. पन्नास अमृतभारत गाड्यांचं उत्पादनही सुरु झालं आहे, अशी माहितीही प्रधानमंत्र्यांनी दिली.

<><><><><>

नीती आयोगाच्या संपूर्णता अभियानात, आज गडचिरोली जिल्ह्यात अहेरी, सिरोंचा आणि भामरागड या ३ तालुक्यांमधे या अभियानाचं उद्घाटन जिल्हा परिषदेत झालं यावेळी उत्कृष्ट कार्य करणाऱ्या अंगणवाडी सेविका, आशा कार्यकर्त्या, कृषी कर्मचारी, आरोग्य कर्मचारी, बचत गटाच्या कार्यकर्त्या आदींना

सन्मानित करण्यात आलं. शिवाय शेतकऱ्यांना बियाणे कीट आणि विद्यार्थ्यांना पुस्तके आणि टॅब वितरीत करण्यात आले.

येत्या ३० सप्टेंबरपर्यंत देशातल्या ५०० तालुक्यात हे अभियान राबवलं जाणार आहे.

**<><><><><>**

उपराष्ट्रपती जगदीप धनखड उद्या दोन दिवसांच्या केरळच्या दौऱ्यावर जाणार आहेत. उद्या सकाळी तिरुअनंतपुरम इथल्या इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ स्पेस सायन्स अँड टेक्नॉलॉजीच्या १२ व्या पदवीदान समारंभाला ते उपस्थित राहणार आहेत. सर्वाधिक गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना ते सुवर्णपदकं प्रदान करणार आहेत. या पदवीदान समारंभानंतर उपराष्ट्रपती कोल्लमला रवाना होणार आहेत.

**//<><><><><>//**